**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले, जि.अहमदनगर,**

**डी.एम.हिंग्लजकर यांचे न्यायालयात**

**भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे प्रकरण २२ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३४७/२०२५**

**निशाणी : ०२**

| | | |
|---|---|---|
| **१.** गुन्हा घडल्याची तारीख | – | ०१.०७.२०२५ |
| **२.** फिर्याद दाखल केल्याची तारीख | – | ०१.०७.२०२५ |
| **३.** फिर्यादीचे नाव, वय व पत्ता इत्यादी तपशीलः | – | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस निरीक्षक,<br>अकोले पोलीस ठाणे, अकोले,<br>ता.अकोले, जि.अहमदनगर. |
| **४.** आरोपीचे नाव, वय व पत्ता इत्यादी तपशीलः | – | **संजय बयाजी दिवटे,**<br>वय– ५८ वर्षे,<br>रा.कारखाना रोड, निशीगंधा कॉलनी,<br>अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर. |

**५. दोषारोपपत्रातील गुन्ह्याचा तपशील जो आरोपीस वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला, तो या प्रमाणेः–**

दिनांक ०१.०७.२०२५ रोजी ११.३० वाजता अकोले, ता.अकोले, जि.अहमदनगर येथील कोल्हार–घोटी जाणारे रोडवर तुम्ही हॉटेल पुजा या दुकानाचे बोर्ड लावून त्या रस्त्यावरून जाणा–या लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल व सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण होईल, अशा पध्दतीने बोर्ड लावलेले

असताना मिळून आलात व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

६. **आरोपीचे प्रतिकथनः–**

प्रश्न क्र.१ – फिर्यादीसोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्या काय ?

उत्तरः– होय.

प्रश्न क्र.२ – दोषारोप पत्रातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हांस वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला, तो तपशील तुम्हास समजला काय ?

उत्तरः– होय.

प्रश्न क्र.३ – सदरचा गुन्हा तुम्हास कबूल आहे काय ?

उत्तरः– मला गुन्हा मान्य व कबूल आहे.

SBolware

.............................................

(आरोपीची सही)

समक्ष

14.3.2026

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**पॅनल प्रमुख**
**राष्ट्रीय लोकन्यायालय, अकोले**

**दिनांकः– १४.०३.२०२६**
**ठिकाणः– अकोले.**

**<u>न्यायनिर्णय</u>**

**१.** आरोपीने वरीलप्रमाणे गुन्हा मान्य व कबूल केला आहे. आरोपीला त्याबाबत विचारणा केली असता त्याने हा गुन्हा स्वखुषीने मान्य व कबूल केला आहे, असे

कथन केले आहे. आरोपीला शिक्षेबाबत विचारणा केली असता त्याने कथन केले की, त्याचेकडून ही चूक पहिल्यांदाच झाली असून त्याचेवर त्याचे कुटूंब अवलंबून आहे. त्यामुळे, कमीत कमी दंड करुन सोडून देण्यात यावे, अशी विनंती आरोपीने केली आहे.

२. आरोपीने केलेल्या विनंतीचा विचार करता व आरोपीविरुध्द ठेवणेत आलेल्या दोषारोपाचा विचार करता आरोपीला रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) इतक्या दंडाची शिक्षा देऊन सोडून देणे न्यायाचे दृष्टीने योग्य व उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :–

## अंतिम आदेश

१. आरोपी **संजय बयाजी दिवटे** यांना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ खालील गुन्हयासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी धरण्यात येत आहे.

२. आरोपीला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ खालील गुन्हयासाठी रक्कम **रु.३००/– (रुपये तीनशे मात्र)** दंड करण्यात येतो व दंड रक्कम न भरल्यास आरोपीला एक दिवसाची साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयांत जाहीर )

14.3.2026

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**पॅनल प्रमुख**
**राष्ट्रीय लोकन्यायालय, अकोले**

**दिनांकः– १४.०३.२०२६**
**ठिकाणः– अकोले.**

**Fine/Penalty Amount of Rs.** 300/-
**Rs.** Three Hundred only.
**Deposited In Recipt No.** 233
**Dt.** 14/3 /2026

14/03/2026
**Assit.Supt.**